SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR– 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell**: 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९०० सांख्यिकी कक्ष :०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२६-२७/ 177 दिनांक : 06/11/2026.

प्रति,

१. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था

विषय : आपल्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विना/अनुदानित महाविद्यालयातील/अधिविभागातील प्रवेशित विद्यार्थी संख्येची प्रवर्गनिहाय माहिती संगणक प्रणालीत भरणे बाबत

संदर्भ : जा.क्र.विशेष कक्ष/२०२६-२७/९५/२०२६, दिनांक-१३ एप्रिल, २०२६ रोजीचे परिपत्रक

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, दरवर्षी आपल्या अधिविभाग / महाविद्यालयाकडून हार्ड व सॉफ्ट कॉपीव्दारे विद्यार्थी संख्येची प्रवर्गनिहाय माहिती विद्यापीठास सादर करण्यात येत होती. परंतू विद्यापीठाकडून सदर माहिती एकत्रित करण्याकरिता संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणाली आपल्या अधिविभाग / महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये **Statistical Information** या मथळयाखाली माहिती भरण्याची सोई करुन देण्यात आलेली आहे. त्यामूळे आपल्या अधिविभाग / महाविद्यालयातील प्रवर्गनिहाय विद्यार्थी प्रवेशित संख्येची माहिती यापूर्वीच्या प्रचलित पध्दतीनुसार हार्ड कॉपीव्दारे सादर करता येणार नाही.

सबब, सदर माहिती विद्यापीठास सादर करावयाची झाल्यास उपरोक्त नमूद केलेल्या संगणक प्रणालीत विद्यार्थी प्रवेशाची माहिती ऑनलाईन भरुन सबमिट करावी लागेल. तद्यनंतर आपल्याकडून भरण्यात आलेल्या माहितीचे रिपोर्ट यांची प्रिंट काढून त्याची एक प्रत हार्ड कॉपी स्वरुपात विद्यापीठास सादर करण्यात यावी. **शैक्षणिक वर्षे २०२६-२७** मधील प्रवेशित विद्यार्थी संख्येची माहिती **दि. ३०/११/२०२६ पर्यंत** ऑनलाईन भरुन सबमिट करण्यात यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव

Instruction Manual for Statistical Reports

१. https://sukapps.unishivaji.ac.in/exam-app/#/login

२. उपरोक्त लिंक वर क्लिक करुन आपल्या महाविद्यालयास देण्यात आलेल्या EXAM युजर आयडी व पासवर्ड याचा उपयोग करुन लॉगीन करण्यात यावे.

३. लॉगीन केल्यानंतर "Statistical Reports" हा टॅब देण्यात आलेल्या आहे. सदर टॅबखालील "Continue" बटनाला क्लिक करण्यात यावे.

४. सदर बटनावर क्लिक केल्यानंतर "Admitted Student List" हे पेज ओपन होईल. सदर पेजवर गेल्यावर "Upload Excel for Students" असा टॅबवर क्लिक करण्यात यावे.

५. उपरोक्त Upload Excel for Students असे पेज ओपन होईल. तद्यनंतर प्रथम "Download Excel Template" टॅबमधून सदर Excel Sheet डाउनलोड करुन घेण्यात यावी.

६. सदर Excel Sheet ओपन करुन "PRN_NO" या कॉलम खाली आपल्या महाविद्यालयातील प्रवेशित पण नियमित विद्यार्थ्यांचे फक्त PRN Number नोदविण्यात यावे. सर्व अभ्यासक्रमांच्या याद्या तयार न करता फक्त पार्टनुसार पण एकत्रित अश्या PRN Number च्या याद्या तयार करण्यात याव्या.

७. PRN Number नोदविताना प्रथम वर्षाचे विद्यार्थी सोडून उरलेल्या सर्व वर्षांचे PRN नोदविण्यात यावे. सदर प्रक्रिया करताना प्रत्येक वर्षानुसार स्वतंत्र Excel Sheet तयार करण्यात यावी. अर्थात २nd year.xlsx, ३rd year.xlsx, ४th year.xlsx, ५th year.xlsx याप्रमाणे सदरच्या Excel Sheet तयार करुन ठेवण्यात याव्या.

८. सदर पार्टनुसार तयार करण्यात आलेल्या Excel Sheet "Upload Excel for Students" या पेजवर जावून "for Academic Instance*" मधील June २०२६ / May २०२७ सिलेक्ट करुन पुढील टॅब "for Part*" मधील अभ्यासक्रमांचे भाग अर्थात २,३,४,५ प्रमाणे सिलेक्ट करुन घेण्यात यावे.

९. त्यानंतर पुढील टॅब "for Status*" मधील "Fresh" हा पर्याय निवडून सदर पार्टची Excel Sheet अपलोड करण्यात यावी. त्यानंतर "Import" बटनवर क्लिक करावे. तद्यनंतर आपण भरण्यात आलेले सर्व रेकॉर्डसची माहिती आल्यावर ती योग्य असल्याचे तपासून "Continues with Valid Records" म्हणून सदरची माहिती सेव करण्यात यावी.

१०. उपरोक्त नमूद प्रक्रिया सर्व अभ्यासक्रमाच्या पार्टनुसार स्वतंत्ररित्या करण्यात यावी. जे PRN Number योग्य होणार नाहीत त्यांची यादी "Error List" या टॅबमध्ये समाविष्ठ करण्यात येईल. सदर टॅबवर क्लिक करुन सदर यादी डाउनलोड करुन घेण्यात यावी व त्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन उपरोक्त "९" प्रमाणे अपलोड प्रक्रिया पुनश्च: राबविण्यात यावी.

११. सदर सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर "Statistical Data" हा टॅबवर जावून "Academic Instance" मधील June २०२६ / May २०२७ सिलेक्ट करुन त्याखालील नमूद करण्यात आलेल्या विवरणपत्रातील माहिती तपासून सदर विवरणपत्राप्रमाणे या कक्षास हार्ड व सॉफट कॉपीत माहिती सादर करण्यात यावी.